# स्वामी मुक्तानंदांच्या वचनांवर ध्यान

## *ईस्टर पर्वाप्रीत्यर्थ सिद्धयोग सत्संग*

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### परमात्म्याचे मंदिर

बाबा मुक्तानंद यांनी 'चित्शक्ती विलास' या ग्रंथामध्ये सांगितलेल्या कथेमध्ये, एक महापुरुष आपला अंतकाळ निकट आल्यावर, आपल्या श्रीगुरूंना, सर्व दिशांना, पंचमहाभूतांना तसेच आपल्या सभोवतालच्या सर्व लोकांना आणि सर्व वस्तूंना धन्यवाद देतात. बाबा म्हणतात, शेवटी त्या महापुरुषाने "जे शरीर परमात्म्याचे चालते-फिरते-बोलते मंदिर आहे, . . . त्या आपल्या शरीराला धन्यवाद दिले, त्याचा सन्मान केला."[१]

शरीर हे परमात्म्याचे मंदिर आहे, म्हणजेच परमात्म्याला स्वतःच्या अंतरी प्राप्त करता येऊ शकते, ही संकल्पना अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरांमध्ये आढळून येते. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्माच्या बायबल या पवित्र धर्मग्रंथामध्ये एक प्रसिद्ध कथन आहे, "पाहा, भगवंताचे साम्राज्य तुमच्या अंतरी आहे."[२] कुराण या ग्रंथामध्ये असे वर्णन आहे की, अल्लाह प्रथम मातीपासून मानवाची निर्मिती करतो आणि मग त्यामध्ये स्वतःचे आत्मचैतन्य फुंकतो.[३] आणि बाबांना त्यांच्या प्रवचनांमध्ये व भक्तांसोबतच्या त्यांच्या संवादांमध्ये ज्या भारतीय शास्त्रग्रंथांतील उद्धरणे देणे प्रिय होते, त्या शास्त्रग्रंथांमध्ये हीच शिकवण वेगवेगळ्या रूपांमध्ये पुन्हापुन्हा आढळून येते. महान संतकवी ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेवर लिहिलेले भाष्य, 'ज्ञानेश्वरी'मधील ही ओवी विचारात घ्या. भगवान श्रीकृष्णाच्या दृष्टिकोणातून लिहिताना संतकवी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "याबद्दल कोणतीही शंका नाही की, मी सकल रूपाकारांमध्ये विद्यमान आहे आणि सर्वकाही माझ्यातच वास करते."[४]

तेव्हा, काही अंशी हे सर्वपरिचित सत्य आहे. आपले शरीर हे भगवंताचे निवासस्थान आहे. प्रश्न हा आहे : या शरीरामध्ये राहण्याचा आपला जो दैनंदिन अनुभव आहे, त्याच्याशी या सत्याचा मेळ आपण कसा घालणार? मला आठवते की, लहानपणी या गोष्टीमुळे मी नेहमी गोंधळलेली असे. मला सिद्धयोगाच्या शिकवणींविषयी खऱ्या अर्थाने बौद्धिक समज येण्यापूर्वीची ही गोष्ट आहे, त्यावेळी मला माझी अस्वस्थता शब्दांमध्ये मांडतादेखील येत नव्हती. मी खिडकीबाहेर एकटक पाहत राहायचे,

कधीकधी तर तासन्तास मी हा विचार करत राहायचे की, लोक मला माझ्या नावाने का हाक मारतात. त्यांना असे का वाटायचे की, *हे* नाव आणि हा चेहरा व हे शरीर म्हणजे *मी* आहे. मला या गोष्टीची खातरी होती की, माझ्या *अंतरी* एक 'मी' आहे आणि मला असे वाटायचे की, लोकांचे लक्ष माझे नाव, चेहरा, शरीर इत्यादींसारख्या बाहेरच्या सरंजामावरच अडकलेले आहे. परंतु मला या सर्व बाह्य गोष्टींपेक्षा माझ्या अंतरीची ती 'मी' अधिक 'खरी' वाटत असे.

मला याचा अर्थबोध होत नव्हता, किमान तोपर्यंत तरी याविषयी काहीच कळत नव्हते, जोपर्यंत अनेक वर्षांनंतर मी श्रीगुरुमाई आणि बाबांच्या शिकवणींचे गांभीर्याने अध्ययन करायला सुरुवात केली नव्हती. मला वाटते की, याच कारणास्तव बाबांची विशेष शिकवण, "तुमचा राम तुमच्या अंतरी तुमच्याच स्वरूपात वास करतो" ही मला इतकी उद्‌बोधक वाटते आणि विशेषतः हे दोन शब्द, 'तुमच्याच स्वरूपात.' माझ्या लहानपणी मला पडणाऱ्या प्रश्नाचे उत्तर ही शिकवण मला देते. तिच्यामुळे माझ्यातील ती जुनी अस्वस्थता शांत होते. ज्या 'मी'ला लोकांनी पाहावे म्हणून मी इतकी आतुर असायचे, ती मुळात त्या 'मी'हून भिन्न नव्हतीच जिला ते पाहू *शकत* होते. [बाबांच्या या शिकवणीबद्दल आणि त्या शिकवणीचा अर्थ काय आहे याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी, मी असे सुचवेन की, तुम्ही स्वामी ईश्वरानंद यांचे या विषयावरील उत्कृष्ट भाष्य वाचावे.] लिंक : [https://www.siddhayoga.org/teachings/2020/be-in-the-temple2/pursue-self-knowledge/]

शरीर हे एक *मंदिर* आहे, बाबांनी इथे दिलेली ही प्रतिमा मला विशेषकरून अतिशय बोधप्रद वाटते. मी जेव्हा 'मंदिरात' असण्याविषयी विचार करते, तेव्हा मंदिराच्या उंबरठ्याच्या आत पाऊल टाकताच मला प्रत्यक्षात दिव्यतेच्या सान्निध्यात असण्याचा अनुभव येऊ लागतो. कधीकधी या अनुभवाची सुरुवात त्याआधीच होऊ लागते, जेव्हा मी बाहेरून मंदिराची वास्तूरचना पाहते आणि आकाशाच्या दिशेने उंच जाणारा त्याचा कळस पाहते. अर्थातच, मी मंदिराच्या दालनांतून जसजशी आत प्रवेश करत जाते, जसजशी मी 'गाभाऱ्याच्या' अधिकाधिक निकट येत जाते, तसतसा भगवंताच्या सान्निध्याचा माझा अनुभव कदाचित अधिकाधिक सखोल व गहन होऊ शकतो. परंतु याआधी घडलेल्या सर्व गोष्टीदेखील याच अनुभवाचा एक भाग असतात; या सर्व गोष्टी हे ठरवतात की, मी कोणत्या भावासह त्या देवतेच्या दिशेने पाऊल टाकते आहे, त्या देवतेबद्दल माझी काय समज आहे आणि त्या देवतेविषयीचा माझा पूज्यभाव व आदरभाव मी कशा प्रकारे व्यक्त करते आहे. या दृष्टीने पाहता, 'मंदिरात' असणे आणि भगवंताच्या सान्निध्यात असणे, या दोहोंना एकमेकांहून भिन्न समजता येणार नाही.

याच संदर्भात, मला हे विचारायचे आहे : तुमचे शरीर ही परमात्म्याचीच अभिव्यक्ती आहे, हे स्मरणात ठेवण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलू शकता [किंवा उचलाल]? तुम्ही वसंताच्या उमंगोत्साहाला तुमच्या श्वासात भरून घेण्यासाठी वेळ काढला आहे का आणि त्यामध्ये असलेल्या आश्वासनाने आणि शक्यतेने तुमच्या दृष्टीला आच्छादित केले आहे का?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] स्वामी मुक्तानंद, *चित्‌शक्ती विलास : एक आध्यात्मिक आत्मकथा,* [चित्‌शक्ती पब्लिकेशन्स, २०२२], पृ. २६२.

[२] लूका [लूक] १७ : २१.

[३] पाहा, उदाहरणार्थ, कुराण १५ : २८-२९, कुराण ३२: ९ आणि कुराण ३८ : ७१-७२.

[४] ज्ञानेश्वरी, अध्याय ६, ओवी ३९०; स्वामी कृपानंद यांच्याद्वारे लिखित *Jnaneshwar's Gita: A Rendering of the Jnaneshwari* [ऑल्बनी, न्यूयॉर्क : SUNY प्रेस, १९९९], पृ ८२.